# सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शुश्रृषा संवर्गातील गट-क सरळसेवेच्या पदभरतीच्या जाहीर प्रकटनबाबत

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रृषा) मुंबई यांच्या राज्यस्तरीय आस्थापनेवरील शुश्रृषा संवर्गातील पाठयनिर्देशिका या संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दिनांक २८.०२.२०२१ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेबाबत मा.संचालक आरोग्य सेवा पुणे व मे. जिंजर प्रा. लि. यांच्याकडून दि.१२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सोबत प्राप्त झालेली गुणवत्ता यादी मा.आयुक्त महोदय आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांच्या मान्यतेने आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर दि.२१.१०.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. परंतु उमेदवारांनी घेतलेल्या आक्षेपानंतर मा.आयुक्त महोदय आरोग्य सेवा मुंबई यांच्या मान्यतेने सुधारित गुणवत्ता यादी व सदरच्या सुधारीत यादीवरुन तयार करण्यात आलेली निवड पात्र उमेदवारांची यादी आयुक्तालयाच्या https://arogya.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर दि.११.११.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने निवड झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन दि.१६.११.२०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन मुंबई येथे आयोजित करण्यात आलेले होते.

त्यानुसार आयुक्तालयस्तरावर कागदपत्र तपासणी अंती एकूण ६२ उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.सदरचे नियुक्ती आदेश संबंधीत उमेदवारांच्या ईमेल आयडीवर तसेच डाकनोंद पोच पावतीने पाठविण्यात आलेले आहेत.

उर्वरीत उमेदवारांच्या नियुक्तीबाबत कागदपत्रे संबंधीत प्राधिकरणाकडून ( खेळाडु, महिला आरक्षण, प्रकल्पग्रस्त, महाराष्ट्र परिचर्या परिषद कडील नोंदणीबाबत व आर्थिक दुर्बल घटक इत्यादी उमेदवाराबाबत) अहवाल आयुक्तालयास प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

दि.१३.१२.२०२२

ठिकाण - मुंबई

स्वाक्षरी /-

उपसंचालक ( शुश्रृषा )आरोग्य सेवा मुंबई

---